MHAH190000312025

**नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२५**
श्रीधर रोहिदास काकडे
वि.
चंद्रकला कल्याण काकडे व इतर

**<u>अर्ज निशाणी क्र. १५ खालील आदेश</u>**

१. वादीने मयत प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे यांचे वारस अभिलेखावर घेवून दावा दुरुस्ती करीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे हे दि. १६/०२/२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे मृत्यूप्रमाणपत्र सोबत दाखल केले आहे. त्यांचे पश्चात त्यांना एकमेव वारस त्यांचा मुलगा नामे – आजिनाथ प्रभाकर देवढे, वय – ४० वर्षे, धंदा–शेती, रा. मोहोज देवढे, ता. पाथर्डी, जिल्हा अ. नगर यास प्रतिवादी क्र.२० चे वारस म्हणुन प्रतिवादीपणात सामील करुन अभिलेखावर घेण्याची व तशी दुरुस्ती करण्याची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर खुलासा दाखल करुन अर्जास हरकत नोंदविली आहे.

४. वादी व प्रतिवांदीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन केले. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यावरुन मयत प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे यांचे दि.१६/०२/२०२५ रोजी निधन झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा वाटप व स्वंतंत्र कब्जा मिळणेकरीता प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे यांचा मृत्यू दिनांक १६/०२/२०२५ रोजी झाले असुन वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.०९/०३/२०२६ रोजी दाखल केलेला आहे. तसेच वादीस प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब निशाणी क्र.११ वरील आदेशान्वये माफ करण्यात आला आहे.

तसेच  प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे मयत झाल्या असल्या तरी त्यांच्या वारसा विरुध्दचा वादीस दावा दाखल करण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दावा परिपूर्ण व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी व दाव्याची बहुविधता टाळण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा सदरचा निशाणी क्र.१५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी क्र.२० केशरबाई उर्फ पार्वतीबाई प्रभाकर देवढे यांचे वर नमूद वारस पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर समाविष्ट करावे व तसे दुरुस्तीप्रत ताबडतोब दाखल करावे.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.11 17:41:53 +0530

दि.११/०३/२०२६

(वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
शेवगाव.